मा. न्यायालया करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): अहिल्यानगर
   P.S. (पोलीस ठाणे): जामखेड
   Year (वर्ष): 2026
   FIR No. (प्रथम खबर क्र.): 0546
   Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 12/08/2026 01:18 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):
   1 Day (दिवस): मंगळवार
   Date from (दिनांक पासून): 11/08/2026
   Date To (दिनांक पर्यंत): 11/08/2026
   Time Period (कालावधी): प्रहर ६
   Time From (वेळेपासून): 15:24 तास
   Time To (वेळेपर्यंत): 16:52 तास

   (b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):
   Date (दिनांक): 12/08/2026
   Time (वेळ): 00:52 तास

   (c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):
   Entry No. (नोंद क्र.): 004
   Date and Time (दिनांक आणि वेळ): 12/08/2026 00:52 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

   1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 01 कि.मी.
      Beat No. (बीट क्र.):

      (b) Address (पत्ता): जामखेड ते खर्डा रोडववरील, हॉटेल महाभगवती जामखेड, जामखेड, जि अहिल्यानगर,

      (c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोलीस निरीक्षक सविता देवीदास तांबे

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1990 (d) **Nationality (राष्‍ट्रीयत्‍ व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाच लुचपत प्रतिबंधक विभाग , अहिल्यानगर , जामखेड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाच लुचपत प्रतिबंधक विभाग , अहिल्यानगर , जामखेड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9834891019

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव मल्हारी ढाकणे | | | 1. कुलकर्णी सर यांचे घरात,Town/Village (शहर / गाव): राम मंदीराजवळ महादेव गल्ली,Tehsil (तहसील): जामखेड,Police Station (पोलीस ठाणे): जामखेड,District (जिल्हा): अहिल्यानगर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद जामखेड पोलीस स्टेशन दि. 12/08/2026

मी सविता देविदास तांबे, वय - 36 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक -लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.9834891019. समक्ष जामखेड पोलीस स्टेषन येथे हजर होवुन सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस

निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 11/08/2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतानां आम्हाला श्री. पवार यांनी दुरध्वनीवरुन संपर्क करुन त्यांचेकडे एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार सांगितली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयात दि. 10/08/2026 रोजी पासुन उपलब्ध असलेले मा.उप प्रादेशिक परिवहन आधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील पंच यांना कार्यालयात बोलवुन कार्यालयात हजर असलेले पोना/709 चंद्रकात काळे, पोकाॅ/ 2262 शेखर वाघ यांची आपापसांत ओळख करून दिली व त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत थोडक्यात माहिती देवुन दोन्ही पंच तसेच ला.प्र.वि.कार्यालयातील पोना/काळे, पोकाँ/वाघ यांना तक्रारदार यांचे लाच मागणी तक्रारीचे अनुशंगाने जामखेड, ता. जामखेड, जि.अहिल्यानगर येथे जावुन कारवाई करण्याचे अनुशंगाने दिनांक 11/08/2026 रोजी 11/30 वा.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथुन आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकीय वाहन क्रं. एम.एच.16, डी.डब्ल्यु.7014 ने लाचलुचपत प्रतीबंधक विभाग, अहिल्यानगर कार्यालयातुन रवाना होवुन अहिल्यानगर सोलापुर रोडने रूइछत्तीशी - मरीजगांव - माहिजळगांव मार्गे जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर येथे सुरक्षित ठिकाणी पोहचलो. तक्रारदार हे त्यांचे चारचाकी वाहनाह सह सुरक्षित ठिकाणी हजर होते. तेव्हा आम्ही त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी गौतम सर्जेराव पवार, वय 51 वर्श, धंदा - शेती, रा. बोरखेड, ता.जि बीड बोरखेड ता.जि. बीड असे सांगितले. त्यानंतर त्यांना शासकीय वाहनात बसवुन घेवुन त्यांना आमची ओळख देवुन दोन्ही पंचांची व सापळा पथकांची ओळख करुन दिली. तसेच तक्रादार श्री.पवार यांची ओळख करुन घेतली. तेव्हा त्यांनी आम्हांस पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली ती पुढील प्रमाणे.

मी बोरखेड येथे राहण्यास असुन आमच्या गावच्या सरपंच जिजाबाई सुनिल काळे यांनी ग्रामपंचायत जातेगांव, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर. येथुन त्यांच्या जन्माचा सन 1988 चा जन्म दाखला प्राप्त केला आहे. सदर जन्म दाखला बनावट असल्याची मला खात्री आहे. त्यामुळे मी जिजाबाई काळे यांची ग्रामपंचायत जातेगांव ता.जामखेड जि. अहिल्यानगर यांच्या नावाने सन 1988 ची जन्म नोंद ग्रामपंचायत जातेगांव येथे जन्म मृत्यु रजिस्टर मध्ये नोंद आहे किंवा नाही याची माहिती पाहिजे असल्यामुळे मी आज दि. 11/08/2024 रोजी जातेगांव ग्रामपंचायत चे ग्रामपंचायत अधिकारी महादेव ढाकणे साहेब यांना मोबाईल वरून संपर्क केला होता. तेव्हा त्यांना मी मला पाहिजे असलेल्या माहितीबाबत बोललो असता. ढाकणे साहेब मला म्हणाले की, मी तुम्हाला पाहिजे ती माहिती देतो, मला जेवढे पैसे देता येतील तेवढे पैसे द्या. असे म्हणाले तेव्हा माझ्या लक्षात आले की, ढाकणे हे सदरची माहिती देण्याकरीता लाचेची मागणी करीत आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.

तक्रारदार श्री. पवार यांनी सांगितलेली तक्रार ही तक्रारदार श्री. पवार यांना व्यवस्थित लिहीता येत नसल्याने तक्रारदार पवार यांचे सांगणेवरून पंच क्र. 2 निलेश गणेश शिंदे, सहा. मोटार वाहन निरीक्षक, अहिल्यानगर यांनी लिहिली त्यावर त्यांनी, दोन्ही पंच व आम्ही सहृया केल्या. तक्रारदार श्री. पवार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकामी तक्रारदार व दोन्ही पंचाना योग्य त्या सुचना देवुन व्हाईस रेकाॅर्डर च्या वापराबाबत माहीती देवुन आमचे सुचनेवरून पोना काळे यांनी व्हाईस रेकाॅर्डे

मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते व्हाईस रेकाॅर्डर चालु करुन तक्रारदार यांचे गळयात कोणास दिसणार नाही अशा पध्दतीने अडकवुन तक्रारदार श्री. पवार व पंच क्र.1 यांना लोकसेवक ढाकणे यांची जामखेड ता. जामखेड जि-अहिल्यानगर येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे चारचाकी वाहन क्र. एम.एच 23 डी.व्ही. 1420 ने 15/24 वा रवाना केले. त्यानंतर तक्रारदार श्री.पवार व पंच नं. 1 हे आम्ही थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी 16/01 वा.परत आले. त्यावेळी आमचे सुचनेवरून पोना काळे यांनी तक्रारदार श्री. पवार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. पवार व पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचे समक्ष घडलेल्या हकिगतीबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, " लोकसेवक ढाकणे यांची जामखेड ता. जामखेड, जि अहिल्यानगर येथे जावुन भेट घेतली त्यावेळी लोकसेवक ढाकणे यांच्यात व तक्रारदार पवार यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक ढाकणे यांनी तक्रारदार श्री. पवार यांचेकडे तक्रारदार पवार यांनी मागीतलेल्या बोरखेड ग्रा.पं. सरपंच जिजाबाई काळे यांच्या नावाने सन 1988 ची जन्म नोंद गा्रमपंचायत जातेगांव येथे जन्म मृत्यु रजिस्टर मध्ये नोंद आहे किंवा नाही याची माहिती देण्याकरीता 10,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची हकिगत सांगितली. सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले तक्रारदार श्री. पवार व लोकसेवक ढाकणे यांचेतील भेटी दरम्यान झालेले संभाशण ऐकले असता त्यामध्ये तक्रारदार श्री. पवार हे लोकसेवक ढाकणे यांना म्हणाले की, मी तुमच्याकडे अर्ज ठेवुन गेलो होतो. त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणाले की, " करू आपण, नेमक काय म्हणण हे, वाचुन घेतो. कुठ मॅटर कोर्टात चालु हे का, त्यावर तक्रारदार म्हणाले, हो. त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणाले की, " जिजाबाई सुनिल काळे यांच्या नावाची सन 1988 ची नोंद जन्मनोंद ग्रामपंचायतीला उपलब्ध नाही, ही जन्म नोंद रजिस्टर मध्ये आढळुन येत नाही. या करीता दाखला दिला आहे." त्यावर तक्रारदार म्हणाले की, "हा". त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणाले कि, दे ना, आमच मिटवा ना, त्यावर तक्रारदार पवार म्हणाले, तुमच मिटवायच दादा, त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणाले की, मिटवा आमच मग झाल, त्यावर तक्रारदार पवार म्हणाले की, किती दयायचे काय सांगा दादा. त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणाले की, तुम्हाला दहा सांगितलेत. दहा देवुन टाका. त्यावर तक्रारदार पवार म्हणाले " दहा हजार" त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणाले, " हो ". त्यावर तक्रारदार ढाकणे म्हणाले की, शे पाचशे कमी करा, त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणले की, " तुम्हाला जेवढ बोललो तेवढ कराव लागेल" त्यावर तक्रारदार म्हणाले कि, दहा हजार नाय, कमी करा राव. त्यावर लोकसेवक ढाकणे म्हणाले कि, " रूपया कमी नाय होणार... हे ध्वनीमुद्रीत झालेले संभाशण व्हाईस रेकाॅर्डर मध्ये ऐकले असता लोकसेवक ढाकणे यांनी तक्रारदार यांच्याकडे ग्रामपंचायत जातेगांव येथे जन्म मृत्यु रजिस्टर मध्ये नोंद आहे किंवा नाही याची माहिती देण्याकरीता 10,000/- रू. लाचेची मागणी केल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. लाच मागणी पडताळणी दरम्यान लोकसेवक ढाकणे यांनी तक्रारदार श्री. पवार यांना लाचेची रक्कम घेवुन स्टॅण्ड वर या असे सांगितले. दरम्यान तक्रारदार यांना लोकसेवक ढाकणे यांचा फोन आला व त्यांनी तक्रारदार यांना "जामखेड खर्डा रोड वरील आपण चहा घेतल्याच्या ठिकाणी ये" असे सांगितले. त्यानंतर लोकसेयक ढाकणे यांचे विरोधात जामखेड खर्डा रोड वरील चहाच्या टपरीवर सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, तक्रारदार यांनी



( छाया देवरे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर

त्यांचेकडे 10,000/-रू. एवढी रक्कम नसुन फक्त 5000/-रू. असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे बचतीतुन 5,000/- रक्कम त्यात 200 रुपये दराच्या 14 भारतीय चलनी नोटा व 100/- रू. दराच्या 22 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर को-या कागदावर लिहिण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हाॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकाॅ/वाघ यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यादरम्यान तक्रारदार यांना लोकसेवक ढाकणे यांनी फोन करून कळविले की, जामखेड खर्डा रोडवरील चहा घेतलेल्या ठिकाणी येण्याबाबत सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना पडताळणी दरम्यान जामखेड खर्डा रोड वरील चहा घेतल्याच्या ठिकाणी जावुन लोकसेवक ढाकणे यांची भेट घ्यावी. लोकसेवक ढाकणे यांनी लाचेची रकमेची मागणी केल्यास पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम त्यांना दयावी व लाच स्विकारले नंतरचा नियोजित इशारा करावा अशा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोना काळे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड टाकुन व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून ते तक्रारदार यांचे गळयात कोणास दिसणार नाही अशा पध्दतीने अडकुन दिले. त्यानंतर तक्रारदार पवार व पंच नं. 1 यांना लोकसेवक ढाकणे यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या चारचाकी वाहनाने 16/35 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही सोबत सापळा पथक रवाना होवुन जामखेड - खर्डा रोड वरील चहा घेतल्याच्या ठिकाणी, जामखेड ता. जामखेड येथे जावुन आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार श्री. पवार व पंच नं. 1 असे चारचाकी वाहनातुन उतरुन त्यांनी चहा घेतलेले ठिकाण हाॅटेल महाभगवती येथे थांबलेले लोकसेवक ढाकणे यांची भेट घेतली. त्यांची भेट झाल्यानंतर लोकसेवक ढाकणे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेचे पैसे स्विकारले नंतर तक्रारदार यांनी त्यांचा उजवा हात डोक्यावरुन फिरवुन लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच आम्ही पंच नं. 2 व सापळा पथकासह जावुन तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकाॅर्डर आमचे सुचनेवरून पोना/काळे यांनी ताब्यात घेवुन ते 16/52 वा बंद केले व तक्रारदार व पंच नं.1 यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी समोरील इसमाकडे बोट दाखवुन सांगितले की, हे लोकसेवक ढाकणे आहेत त्यांनी लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून मोजुन घेतली व त्यांच्या हातातच ठेवलेली आहे. त्यानंतर आम्ही सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव महादेव मल्हारी ढाकणे, वय 52 वर्श, पद - ग्रामविकास अधिकारी, जातेगांव ग्रामपंचायत, रा. कुलकर्णी सर यांचे घरात भाडयाने, राममंदीराजवळ महादेव गल्ली जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर. मु.रा. रामकृशणनगर, नेवासा खुर्द ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक ढाकणे यांचे हातात असलेली लाचेची रक्कम पंच नं.2 यांचेकरवी ताब्यात घेवुन त्यामध्ये लाचेच्या नोटा असल्याची खात्री केली. त्यानंतर आम्ही लोकसेवक पवार यांना शासकीय वाहनात सोबत घेवुन सापळा पथकासह जामखेड पोलीस स्टेशन येथे आलो व तेथील एक कक्ष उपलब्ध करून घेवुन सदर कक्षामध्ये आवष्यक तो अंधार करून लोकसेवक ढाकणे यांचे हातांची तसेच लाचेच्या रकमेची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात

तपासणी केली. त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज केले.

तरी, दिनांक 11/08/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 15/24 ते 16/01 वाजेच्या दरम्यान जामखेड खर्डा रोड वरील हाॅटेल महाभगवती येथे लोकसेवक ढाकणे यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार श्री.पवार यांनी बोरखेड ता.जि. बीड या गावच्या सरपंच जिजाबाई सुनिल काळे यांची ग्रामपंचायत जातेगांव ता.जामखेड जि. अहिल्यानगर यांच्या नावाने सन 1988 ची जन्म नोंद ग्रामपंचायत जातेगांव येथे जन्म मृत्यु रजिस्टर मध्ये नोंद आहे किंवा नाही याची माहिती देण्याकरीता पंचासमक्ष 10,000/- रुपये लाचेची मागणी केली व सापळा कारवाई 16/35 ते 16/52 वाजेच्या दरम्यान जामखेड - खर्डा रोडवरील हाॅटेल महाभगवती ठिकाणी लोकसेवक ढाकणे यांनी लाचेची रक्कम 5000/- रूपये तक्रारदार श्री. पवार यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन लोकसेवक महादेव मल्हारी ढाकणे, वय 52 वर्श, पद - ग्रामपंचायत अधिकारी, जातेगांव ग्रामपंचायत, रा. कुलकर्णी सर यांचे घरात भाडयाने, राम मंदीराजवळ महादेव गल्ली जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर. मु.रा. रामकृश्णनगर, नेवासा खुर्द ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष हि फिर्याद दिली

( सविता तांबे )

पोलीसनिरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो,अहिल्यानगर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** dashrath nimba choudhari (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**



(छाया पवार)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dashrath nimba choudhari

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

पोलीस ठाणे अंमलदार
जामखेड पो.स्टे

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**